## प्रेस नोट दिनांक ०१/०२/२०२५

### शहर गुन्हे शाखेकडून, ०१ इनोव्हा कार, ०६ मोटार सायकल, मोटर पंप चोरी, असे चोरीचे ०८ गुन्हे उघडकीस.

---

अ) दिनांक ०४/०१/२०२५ ते दिनांक १८/०१/२०२५ चे कालावधीत, गुन्हे शाखेकडील पो.उप.नि./मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार असे, सोलापूर शहर परिसरात सतर्कतेने पेट्रोलिंग करत असताना, त्यांना प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीचे आधारे, **इसम नामे- १) निशांत बापू बनसोडे २) विशाल आनंद ढेरे ३) अक्षय अमोल कदम असे ०३ इसम,** सर्व राहणार सोलापूर यांना ताब्यात घेवुन, नमूद पथकाने त्यांचेकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, सोलापूर शहर पोलीस ठाणे हद्दितील तसेच बार्शी येथील चोरीस गेलेल्या, **मोटार सायकल चोरीचे,** खालील प्रमाणे **एकुण ०६ गुन्हे उघडकीस आले आहेत.**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| १ | फौजदार चावडी | ०४/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२) | MH 13 CP 7834 |
| २ | एम आय डी सी | ०५/२०२३ भा.न्या.सं.क.३०३(२) | MH 13 DJ 7620 |
| ३ | बार्शी शहर सोलापूर ग्रामीण | ९७५/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२) | MH 45 P 1396 |
| ४ | जेलरोड | ०८/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२) | MH 13 CP 7834 |
| ५ | जेलरोड | ०९/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२) | MH 13 DJ 7620 |
| ६ | जोडभावी | २७/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२) | MH 13 CC 2369 |

ब) **त्याचप्रमाणे,** दिनांक २४/०१/२०२५ रोजी, पो.उप.नि./मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकास प्राप्त गोपनिय माहितीचे आधारे, धुळे येथून **इसम नामे- अभिजीत दिलीप चव्हाण,** वय-३० वर्षे, रा.मेन रोड, चव्हाण ज्वेलर्स बाजार पेठ, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे यास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातुन, विना नंबर प्लेटची टोयोटा कंपनीची इनोव्हा कार जप्त केली आहे. त्यानुसार, **फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.३५/२०२५ भा.द.वि.क.३७९ अन्वये,** दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.

क) **त्याचप्रमाणे,** गुन्हे शाखेकडील पोउपनि/मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकास प्राप्त गोपनिय माहितीचे आधारे, **इसम नामे- जमीर अब्दुल रहेमान पैरमपैली,** वय-३९, रा.कुर्बान हुसेन नगर, सोलापूर यास ताब्यात घेवुन, त्याचेकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, त्याने सन २०२३ मध्ये दोन अनोळखी व्यक्तींकडून ०२ चोरीचे मोटार पंप घेतल्याचे निषन्न झाले. सदरचे ०२ मोटार पंप त्याचेकडून जप्त करणेत आले आहेत. त्याबाबत, अभिलेख तपासला असता, **विजापूर नाका पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.१०१/२०२३ भा.दं.वि.क.३७९ अन्वये,** दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.

**अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेकडील पो.उप.नि./मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकाने, ०१ इनोव्हा कार, ०६ मोटार सायकल, पाण्याचे मोटार पंप चोरीचा ०१ गुन्हा, असे एकूण ०८ चोरीचे गुन्हे उघडकीस आणून, एकूण ५,९५,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

सदरची कामगिरी मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे/वि.शा., श्री.राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली- पो.उप.नि./मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, प्रकाश गायकवाड, मछिंद्र राठोड, बाळु काळे, यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**